www.rajdand.com
सातारा, मंगळवार
02.01.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । मार्गशीर्ष कृ.१
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

**लोकसभेसाठी मोर्चेबांधणी**



(पान २ वर)

# देशभर मालवाहतूक ठप्प

## ८ राज्यातील ट्रकचालक संपावर; नवीन हिट अँड रन कायद्याला विरोध

## राज्यात विविध शहरात पेट्रोल पंपावर रांगा

### कोल्हापूरमध्ये संप मागे, पुण्यात पेट्रोल पंप सुरु राहणार

**अहमदनगर/मुंबई :** केंद्र सरकारच्या नव्या वाहन कायद्याला विरोध म्हणून देशभरातील वाहनचालकांनी तीन दिवसांसाठी संप पुकारलेला आहे. आज दुपारी नवी मुंबईत ट्रक चालक आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं होतं. राज्यातील आणखी काही शहरांमध्ये देखील वाहनचालक आक्रमक झाले होते. या संपामुळं पेट्रोल आणि डिझेलच्या पुरव परिणाम झाल्यानं छत्रपती संभाजीनगर शहरातील काही पेट्रोल पंपावर मोठ्या रांगा लागल्याचं चित्र पाहायला मिळालं. कोपरगावमध्ये देखील पेट्रोल पंपावर वाहनधारकांची गदी दिसून आली. मात्र, ऑल इंडिया पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे प्रवक्ते अली दारुवाला यांनी सर्व पेट्रोल पंप सुरु राहतील असं सांगितलं आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील पेट्रोल पंप सुरु राहणार आहेत, असं ते म्हणाले.



छत्रपती संभाजीनगरमधील क्रांती चौक भागातील पेट्रोल पंपावर वाहनांच्या मोठ्या प्रमाणावर रांगा लागल्या होत्या. तर, काही पंप बंद दिसून आले. दीड ते दोन तास थांबल्यानंतर ग्राहकांना पेट्रोल मिळाले. सरकारनं या समस्येवर तोडगा काढावा अशी मागणी ग्राहकांनी केली.

केंद्र शासनाच्या वतीने वाहन चालकांच्या संदर्भात हिट अँड रनच्या नवीन धोरणाच्या निषेधार्थ देशभरातील वाहन चालकांनी तीन दिवसीय संप पुकारलेला आहे. या संपामध्ये पेट्रोल डिझेलची वाहतूक करणारे चालक देखील सहभागी असल्याने पुढील दोन ते तीन दिवस पेट्रोल डिझेलचा तुटवडा जाणवेल या भीतीनं कोपरगाव शहरातील अनेक पेट्रोल पंपावर अचानक वाहनधारकांनी गदी केल्याने अनेक पेट्रोल पंपावरचा डिझेल आणि पेट्रोलचा पुरवठा संपलेला आहे. तर, काही ठिकाणी शिल्लक असलेल्या पेट्रोल मिळावा यासाठी वाहनधारकांनी एकच गदी केलेली आहे. कोपरगावात पेट्रोल पंपावर पोलीस दाखल झाले आहेत.

पेट्रोल डिझेल कंपनीच्या टँकर चालकांच्या संपाच्या पाश्वर्भूमीवर जालन्यात पंपांवर इंधन भरण्यासाठी वाहन चालकांनी एकच गदी केल्याचे दिसून आले. नवीन मोटार वाहन कायद्याला विरोध करण्यासाठी पेट्रोल डिझेल कंपनीचे ट्रकचालक यांनी संपाचे हत्यार उपासले आहे. बीपीसीएल, एचपीसीएल आणि इंडियन ऑइल या तिन्ही कंपन्यांचे पेट्रोल-डिझेल पुरवठा करणाऱ्या टँकरचालकांनी संपाची हाक दिली असून १ ते ३ जानेवारी दरम्यान टँकरचालक संपावर जाणार आहेत. त्यामुळे पंप बंद राहण्याच्या भीतीपोटी वाहनधारक पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी पंपांवर रांगा लावत असल्याचे जालन्यात पाहायला मिळत आहे.

### पुणे, पिंपरी चिंचवडमधील पेट्रोल पंप सुरु राहणार

जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप खुले राहतील, असे ऑल इंडिया पेट्रोल डीलर्स असोसिएशनने स्पष्ट केले आहे. संपूर्ण भारतातील वाहतूकदारांच्या संपाचा पेट्रोल आणि डिझेलच्या पुरवठ्यावर परिणाम होणार नाही. कारण जिल्हा प्रशासनाने लोणी डेपो पेट्रोलियम पदार्थांच्या रिफिलिंगसाठी पेट्रोलियम टँकरना पोलीस संरक्षण दिले आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये सर्व पेट्रोल पंप सुरू राहणार आहेत, असं अली दारुवाला म्हणाले.

दरम्यान, रत्नागिरी, सांगली आणि कोल्हापूरमध्ये काही पेट्रोल पंपावर रांगा असून अद्याप पेट्रोलचा तुटवडा निर्माण झालेला नाही. राज्य सरकारनं सर्व जिल्हाधिकाऱ्यांना नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# फक्त १० मिनिटात २२ भूकंपाचे धक्के

## जपानवरील त्सुनामीचा धोका झाला कमी




**टोकियोः** जपानमध्ये आलेल्या भूकंपानंतर समुद्र किनाऱ्यावर त्सुनामी धडकली आहे. त्सुनामीच्या लाटांची उंची ०.४ मीटर उंच आहे. या लाटांची उंची आणखी मोठी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. टोकियो इलेक्ट्रिक पॉवर कंपनीने शुक्रवारी जपानच्या निगाटा प्रांतात असलेल्या जागातील सर्वात मोठ्या आण्विक ऊर्जा केंद्र काशीवाजाकी-कावीवा जवळ लाटांची उंची ०.४ मीटर इतकी नोंदवली आहे. फुकुई प्रीफिक्चर सुरक्षा समितीने आण्विक केंद्राला सध्या तरी कोणताही धोका नसल्याचे म्हटले आहे. केंद्रावर आणीबाणीची परिस्थिती नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान दक्षिण कोरिया हवामान संस्थाने दिलेल्या माहितीनुसार त्सुनामीची लाट दक्षिण कोरियाच्या गँगवॉन प्रांतातील मुखोच्या पूर्व किनारपट्टीवर पोहोचली. या लाटेची उंची ४५ सेमी इतकी नोंदवण्यात आली आहे.

जपानमध्ये आलेल्या भूकंपानंतर दक्षिण कोरियाच्या पूर्वेकडील प्रांताने रहिवाशांना स्थलांतर करण्यास सांगितले आहे.दक्षिण कोरियाच्या गँगवॉन प्रांताने सोमवारी रहिवाशांना सावधगिरी बाळगण्याचा आणि उंच जागेवर जाण्याचा इशारा दिला आहे. द.कोरिया पाठोपाठ रशियातील व्लादिवोस्तोक आणि नाखोडका या शहरांना त्सुनामीचा इशारा देण्यात आला आहे. तर उत्तर कोरियाने पूर्व किनारपट्टीवर त्सुनामीचा इशारा दिला आहे. योनहॅप न्यूजने दिलेल्या वृत्तानुसार पूर्व किनाऱ्यावर २.०८ मीटर पर्यंतच्या लाटा धडकू शकतात.


जपानच्या उत्तरेकडील होक्काइडोपासून ते दक्षिणेकडील क्यूशपर्यंतच्या पश्चिम किनारपट्टीपर्यंत त्सुनामीचा अलर्ट देण्यात आला आहे. इशिकावा प्रांतात भूकंपानंतर सर्वात मोठ्या त्सुनामीचा धोका जाहीर करण्यात आलाय. स्थानिक वेळेनुसार दुपारी ४ वाजून ६ मिनिटापासून हा धोका असल्याचे सांगण्यात आले आहे. इशिकावा आणि निगाटा प्रांतात ४.३ ते ७.६ तीव्रतेच्या भूकंपाचे ९ धक्के बसले आहेत.

भूकंपानंतर देशातील अनेक महामार्ग बंद झाले आहेत. तर हजारो घरांची वीज गेली आहे. हवाई येथील पॅसिफिक त्सुनामी माहिती केंद्राने दिलेल्या माहितीनुसार जपानमधील मुख्य बेट होन्शूच्याबाजूने, भूकंपाच्या केंद्रापासून ३०० किलोमीटर अंतरावरून धोकादायक त्सुनामीच्या लाटा येण्याची शक्यता आहे. सरकारी वृत्तवाहिनी एनएचके टीव्हीने दिलेल्या वृत्तानुसार, लाटांची उंची पाच मीटर इतकी असू शकते. किनारपट्टी भागातील लोकांनी तातडीने उंच ठिकाणी किंवा जवळच्या इमारतीच्या वरच्या मजल्यावर जावे. जपानच्या पश्चिम किनारपट्टीवर निगाटा आणि अन्य ठिकाणी कमी उंचीच्या त्सुनामी लाटांची नोंद झाली आहे.

## कारची झाडाला धडक, युवतीचा मृत्यू

**सिंधुदुर्गः** कुडाळ येथून आपल्या मित्रांसोबत न्यू इयर सेलिब्रेशनसाठी सावंतवाडी येथे येऊन पहाटे परत निघत असताना मारुती सुझुकी गाडीची आंब्याच्या झाडाला धडक बसून झालेल्या अपघातात एका युवतीचा मृत्यू झाला. ऐश्वर्या महेश कवठणकर (२१, रा. पिंगुळी उत्कर्षनगर, ता. कुडाळ) असे तिचे नाव आहे. तर तिच्यासोबतचे दोन युवक जखमी झाले. कोलगाव येथील शैलू पै यांच्या हाडर्वेअर शोरूमसमोर पहाटे पाचच्या सुमारास हा अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, ऐश्वर्या ही तिचे मित्र सिद्धांत अशोक बांदेकर (रा. कुडाळ बाजारपेठ ता. कुडाळ) आणि साहील तेंडोलकर (रा. तेंडोली) यांच्या समवेत सिद्धांत बांदेकर याच्या मालकीच्या मारुती सुझुकी या गाडीत बसून त्यांचे सोबत न्यू इयर सेलिब्रेशनला गेली होती. पहाटे पाचच्या सुमारास कुडाळ येथे परतत असतात कोळगाव येथील शैलू पै यांच्या हाडर्वेअर शोरूमच्या समोरील आंब्याच्या झाडाला समोरुन धडक बसली. या अपघातात गाडीच्या क्लीनर साईडला बसलेली ऐश्वर्या ही गंभीर जखमी झाली.



या अपघाताची माहिती समीर वाळके रा. कुडाळ यांनी ऐश्वर्याचे वडील महेश यांना देताच त्यांनी आपल्या नातेवाईकांसह घटनास्थळी धाव घेतली. यावेळी गाडीच्या बाहेर ऐश्वर्या ही बेशुद्ध अवस्थेत पडलेली दिसली. तसेच त्या गाडीच्या बाजुला सिद्धांत बांदेकर हा होता. त्याच्या डोक्याला दुखापत झाली होती. तर दुसरा मित्र साहील तेंडोलकर यास गंभीर दुखापत झाल्याने त्याला उपचारार्थ दवाखान्यात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर महेश यांनी रुग्णवाहिकेतून सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालय येथे तिला उपचारार्थ हलविले. मात्र, उपचारापूवीच तिचे निधन झाले असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

## ठाण्यात तरूणांची रेव्ह पार्टी; पाच महिलांसह ९५ जण ताब्यात

**ठाणे :** नववर्षाच्या स्वागतासाठी सगळीकडे उत्साह दिसत असताना ठाण्यात एक मोठी कारवाई करण्यात आली आहे. घोडबंदर परिसरातील गायमूख येथे एक रेव्ह पार्टी आयोजित करण्यात आली होती. या पाटीवर धाड टाकून पोलिसांनी ९५ तरुणांना ताब्यात घेतले आहे. त्यात पाच महिलांचा समावेश आहे. ही पाटी अवैधरित्या आयोजित करण्यात आली होती, तसेच तिथे अमली पदार्थांचे सेवन केले जात असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन तरूण आयोजकांनी या पाटीचे अवैधरित्या आयोजन केले होते. त्यांना ताब्यात घेतले आहे. पाटीतून एलएसडी, चरस, एक्स्टसी गोळ्या आणि गांजा हस्तगत करण्यात आला



आहे. पोलिस अधिकारी आशुतोष डुंबरे यांनी २१ डिसेंबर रोजी ठाणे पोलिस आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला होता, त्यांनी इंडियन एक्सप्रेसशी बोलत असताना याबद्दलची माहिती दिली.

ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे मध्यरात्री युनिट पाचचे पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. गायमूख येथील खाडी परिसरात भराव टाकून तयार केलेल्या मोकळ्या जागेत ही पाटी सुरू होती. हा भाग कासारवडवली पोलिसांच्या कार्यक्षेत्रात येतो.

पोलिसांनी सांगितले की, १९ ते २० वर्षांमधील तरूण मुले पाटीत सामील होते. त्यांनी अमली पदार्थ आणि मद्याचे सेवन केले होते. तसेच मोठ्या आवाजात गाणी लावून धांगडधिंगा सुरू होता. पोलिसांनी २०० ग्रॅम गांजा, ७० ग्रॅम चरस, ०.४० ग्रॅम एलएसडी आणि एक्स्टसी गोळ्या जप्त केल्या आहेत. गुन्हे अन्वेषण विभागचे अतरिक्त आयुक्त पंजाबराव उगळे म्हणाले की, आम्ही ९० पुरूष आणि ५ महिलांना ताब्यात घेतले आहे. त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार असून त्यांचे अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कारवाई करण्यात येईल.

ताब्यात घेतलेले तरूण ठाणे, मीरा रोड, पालघर, कल्याण, डोंबिवली आणि नवी मुंबई येथील रहिवासी आहेत. प्राथमिक चौकशीत डोंबिवलीतील रहिवासी तेजस कुणाल (२३) आणि ठाण्यातील कळवा येथे राहणाऱ्या सुजल महाजन (१९) यांच्यावर पाटी आयोजित करण्याचा आरोप ठेवला गेला आहे. त्यांनी एक हजार रुपये प्रवेश शुल्क घेऊन सदर पाटी आयोजित केली होती.

दोन्ही संशयित आरोपींनी फेसबुक आणि इन्स्टाग्रामच्या माध्यमातून दोन पाटी सुरू होण्याच्या दोन तासांपूवी पाटीचा पत्ता आणि माहिती पोस्ट केली होती. या पाटीत अमली पदार्थ कुणी पुरविले, याची माहिती पोलिस गोळा करत आहेत. भारतीय दंड संहिता आणि एनडीपीएस कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे, असे पोलिसांनी सांगितले.

## कॅन्सर रुग्णांना रुग्णसेवेसाठी टाटा हॉस्पिटल करणार एआय टेक्नोलॉजीचा वापर

**मुंबईः** जागतिक पातळीवर अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीच्या (एआय) वापराला गती येत आहे. बदलत्या तंत्रज्ञानाची कास पकडून आता टाटा कॅन्सर रुग्णालयासह देशातील अन्य चार महत्त्वाच्या संस्थांनी एआयचा वापर रुग्णसेवेसाठी करण्याचा निर्णय घेतला आहे.




मुंबईतील टाटा कॅन्सर रुग्णालयामध्ये रुग्णांच्या रेडिओलॉजी आणि पॅथालॉजीशी संबंधित निदाननिष्कर्षांच्या नोंदी या बॅंकेमध्ये जतन करण्यात येत आहेत. त्यामुळे रुग्णांच्या निदान व पुढील वैद्यकीय उपचारपद्धतीची दिशा ठरवण्यामध्ये निश्चितपणे मदत मिळेल, असा विश्वास तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. टाटा कॅन्सर रुग्णालय या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे समन्वयक असून, यामध्ये आयआयटी मुंबई, दिल्लीचे एम्स, चंडिगड येथील पीजीआय आणि दिल्लीमधील राजीव गांधी रुग्णालयाचा यात सहभाग आहे.

'इमेजिंग बायोबॅंक फॉर कॅन्सर' या प्रकल्पामध्ये रुग्णांच्या रेडिओलॉजी, तसेच पॅथालॉजी चाचण्यांमधील स्लाइडचे जतन करण्यात येत आहे. त्यामुळे आजाराच्या निदानासह वैद्यकीय उपचारांचे पर्याय निवडताना अधिकाधिक अचूक वैद्यकीय निष्कर्षापर्यंत जाता येईल, असा विश्वास टाटा स्मारक केंद्राचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'कडे व्यक्त केला. प्रत्येक वर्षी हजारो रुग्ण कॅन्सरवर मात करण्यासाठी टाटा कॅन्सर रुग्णालयामध्ये वैद्यकीय उपचार घेतात. उपचारप्रक्रियेतील रेडिओलॉजी आणि पॅथालॉजी इमेजेस, तसेच स्लाइड्सचे जतन या इमेजिंग बॅंकमध्ये केले जात आहे.

'इमेजिंग बायोबॅंक फॉर कॅन्सर' या प्रकल्पामध्ये रुग्णांच्या रेडिओलॉजी, तसेच पॅथालॉजी चाचण्यांमधील स्लाइडचे जतन करण्यात येत आहे. त्यामुळे आजाराच्या निदानासह वैद्यकीय उपचारांचे पर्याय निवडताना अधिकाधिक अचूक वैद्यकीय निष्कर्षापर्यंत जाता येईल, असा विश्वास टाटा स्मारक केंद्राचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'कडे व्यक्त केला. प्रत्येक वर्षी हजारो रुग्ण कॅन्सरवर मात करण्यासाठी टाटा कॅन्सर रुग्णालयामध्ये वैद्यकीय उपचार घेतात. उपचारप्रक्रियेतील रेडिओलॉजी आणि पॅथालॉजी इमेजेस, तसेच स्लाइड्सचे जतन या इमेजिंग बॅंकमध्ये केले जात आहे.

## नववर्षाच्या पहिल्याच दिवशी मुंबई नाशिक महामार्गावर भीषण अपघात

**ठाणे :** मुंबई नाशिक महामार्गावरील पाचपाखाडी भागात सोमवारी सकाळी मोटारीचे चाक पंक्चर होऊन चालकाचा ताबा सुटून रस्त्याकडेला उभ्या असलेल्या एका टेम्पोला मोटार धडकली. या धडकेत पाच प्रवासी गंभीर जखमी झाली असून यातील दोघांची प्रकृती चिंताजनक आहे.

फय्याज शेख (५१), विकास कुमार (२१), शिवशंकर विक्रम आदित्य (३३), संतोष कुमार (२४) आणि प्रदीप प्रसाद (२५) अशी जखमींची नावे आहेत. यातील संतोष आणि विकास यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी मुंबईतील शीव रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर उर्वरित जखमींवर ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहे.



मुंबई नाशिक महामार्गावरून सोमवारी सकाळी टाटा सुमो ही मोटार ठाण्याच्या दिशेने वाहतुक करत होती. मोटारीमध्ये फय्याज हा वाहन चालवित होता. तर उर्वरित त्याच्यासोबत प्रवास करत होते. सकाळी ७ वाजताच्या सुमारास मोटार पाचपाखाडी भागात आली असता, मोटारीचे मागील चाक पंक्चर झाले आणि फय्याजचा वाहनावरील ताबा सुटला. त्यामुळे त्यांची मोटार रस्त्याकडेला विटांनी भरलेल्या एका टेम्पोला धडकली. हा अपघात इतका भीषण होता की, मोटारीच्या पुढील भागाचा चुराडा झाला. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांचे पथक, ठाणे महापालिकेचे अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असून जखमींवर उपचार सुरू आहेत.

# लोकसभेसाठी मोर्चेबांधणी

**लोकसभा निवडणुका मार्च ते मे या काळात होणार आहेत. विरोधी पक्ष आणि सत्ताधारी भाजपनं कोणत्याही परिस्थितीत निवडणुका जिंकण्याचा चंग बांधला आहे. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल या पाच राज्यांत सुमारे अडीचशे जागा असल्यानं याच राज्यांत मोठ्या उलथापालखी घडवून आणण्याचा भाजपचा प्रयत्न आहे, तर भाजपला शह देताना देशभर एकास एक लढत करण्याचं नियोजन विरोधी पक्ष करीत आहेत. विरोधी पक्षातील काहींना फोडण्याचा तसंच राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील जुन्या मित्रांना पुन्हा आपलंसं करण्यावर भाजपनं भर दिला आहे. त्याचबरोबर भाजपच्या मदतीला आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघही मैदानात उतरला आहे. राजकारणाशी काहीही संबंध नसल्याचं सांगणाऱ्या संघानं आता प्रांतवार नियोजन सुरू केलं आहे. महिला आरक्षण, जी-२०ची फलश्रुती भाजपच्या फायद्याचं ठरणार आहे.**



देशात १८व्या लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यातील मतदानाची प्रक्रिया मार्चमध्येच सुरू होईल असा अंदाज आहे. असं असलं, तरी राजकीय पक्षांनी फार अगोदरच २०२४ च्या निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. त्यादृष्टीनं प्रमुख राजकीय पक्षांनी संघटनात्मक बदल केले आहेत. भारतीय जनता पक्षानं राज्याचे प्रभारी बदलले आहेत. काँग्रेसनं कर्नाटक जिंकल्यानंतर सर्वपक्षांना बरोबर घेताना काही तडजोडी करायला सुरुवात केली आहे. राजस्थान काँग्रेसमधील गटबाजी गेली अडीच वर्षे गाजत होती. तिथल्या वादावर काँग्रेसनं तोडगा काढला आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांची “भारत जोडो” यात्रा २०२४ समोर ठेवून तयार करण्यात आली होती. आता त्यांची दुसरी “भारत जोडो” यात्रा सुरू होणार आहे. संयुक्त जनता दलाचे नेते नितीश कुमार गेल्या वर्षापासून सर्व मोदीविरोधी आणि भाजपविरोधी राजकीय पक्षांना एका व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न करत आहेत. पाटणा, बंगळूर, मुंबई आदी ठिकाणी विरोधकांच्या बैठका झाल्या. काँग्रेस आणि डाव्यांवर एरव्ही तुटून पडणाऱ्या आणि एकला चलो रेची भूमिका घेणाऱ्या ममता बॅनजी विरोधकांच्या बैठकीला हजर राहिल्या. एवढेच नाही, तर त्यांचा फॉर्म्युला “इंडिया” आघाडीनं स्वीकारला आहे. आतापर्यंत एकमेकांवर तुटून पडणारे नेते आता भाजप सरकारविरोधात एकत्र आले आहेत. त्यामुळं भाजपनं नाही म्हटलं, तरी धास्ती घेतली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना महाराष्ट्राबाहेर पडून विरोधकांची मोट बांधता येऊ नये, म्हणून त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला भाजपनं पद्धतशीर खिंडार पाडलं. त्याचं कारण असं, की महाविकास आघाडी एकत्र लढली, तर भाजपला सात-आठच्या वर जागा मिळणार नाहीत, असे विविध पाहण्यांचे अंदाज होते. पवार हेच महाआघाडीचे नेते होते. त्यांच्या पक्षात फूट पाडली आणि त्यांच्याबरोबर आमदार राहिले नाही, तरी पवार यांनी ज्या पद्धतीनं महाराष्ट्र पिंजून काढायला सुरुवात केली आहे, ते पाहिलं, तर भाजपचं ४५ जागा जिंकण्याचं स्वप्न पूर्ण होईल, असं वाटत नाही. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे ही राज्याच्या दौऱ्यावर बाहेर पडले आहेत. पवार-ठाकरे यांच्या दौऱ्यांना मिळणारा प्रतिसाद पाहता त्यांना सहानुभूती मिळण्याची शक्यता आहे. भाजपचे नेते प्रचारसभांना होणारी गदी मतदानाला येणार नाही, असं कितीही सांगत असले, तरी त्यांनी काही प्रमाणात धसका घेतला आहे, एवढं नक्की. कामानं, प्रश्न सोडवून सत्तेत येण्याचा भाजपचा विश्वास डळमळीत झाल्यामुळं महाराष्ट्राच्या पाठोपाठ आता बिहारमधला संयुक्त जनता दल आणि राष्ट्रीय जनता दल साम, दाम, दंड, भेद या नीतीचा अवलंब करून फोडण्याचं घाटत आहे. राष्ट्रीय जनता दलाच्या नेत्यांमागं रेल्वे भरती घोटाळ्याचं शुक्लकाष्ठ आधीच लावून झालं आहे. मागच्या विधानसभा निवडणुकीत चिराग पासवान यांचा उपयोग करून संयुक्त जनता दलाचं खच्चीकरण करण्यात आलं होतं. आता आणखी फूट पाडण्याचा डाव आहे. दुसरीकडं कर्नाटकात एवढी नामुष्की येऊनही तिथं पुन्हा ऑपरेशन लोटस राबवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे.

कर्नाटक निवडणुकीपूर्वी सर्व विरोधी पक्ष राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली एकत्र यायला तयार नव्हते. कारण विरोधी पक्षातील सर्व राजकीय पक्षांचे नेते २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी स्वतःला पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून प्रोजेक्ट करण्यात मग्न होते; मात्र कर्नाटकच्या विजयानंतर आता २०२४ मध्ये भाजपचा पराभव होऊ शकतो, असं काँग्रेसला वाटत आहे. त्यामुळं राहुल गांधी यांना परिपक्व नेता म्हणून दाखवण्यासाठी काँग्रेस अनेक कार्यक्रम आयोजित करत आहे. त्यातच मोदी या आडनावावरून केलेल्या टीकेमुळं राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा गुजरात न्यायालयानं केली होती. त्याचा काँग्रेसनं उपयोग करून घेतला. सर्वोच्च न्यायालयानं आता त्यांच्या शिक्षेला स्थगिती दिली असली, तरी हे प्रकरण लोकसभा निवडणुकीपूर्वी सुनावणीला यावं आणि त्यांच्या अपात्रतेवर शिक्कामोर्तब व्हावं, असा भाजपचा प्रयत्न आहे. तसं झालं, तर उलट काँग्रेसच्या हाती आयतं कोलित मिळेल. राहुल यांच्याविरोधात देशातील अनेक न्यायालयात याच प्रकारचे दावे आहेत.राहुल यांची प्रतिमा पप्पू अशी करण्यात आली होती. राहुल यांनी प्रयत्नपूर्वक प्रतिमा सुधारली असली, तरी पक्षाचं संघटनच शिल्लक नाही. भाजपच्या तुलनेत संघटना, पैसे, संसाधनं अशा सर्वंच बाबतीत विरोधक कमी पडणार आहेत. मेदी यांच्यासारखा चतुरस्त्र आणि लाखोंच्या सभा गाजवणारा, देशभर लोकप्रिय असलेला नेता विरोधी पक्षांकडं नाही. ही वस्तुस्थिती असली, तरी गुन्हेगार प्रवृत्तीच्या खासदाराला पाठिशी घालणं, लोकशाहीतील संज्ञाना हरताळ फासणं, संविधानिक मूल्यांना तिलांजली देण्यासारखे प्रकार भाजपनं सुरू ठेवले आहेत. न्यायव्यवस्थेत हस्तक्षेपाचा प्रयत्न अयशस्वी झाला. कुस्तीपटूंच्या लैंगिक शोषणाचं प्रकरण असो, की मणिपूरमध्ये पाच महिन्यांहून अधिक काळ चाललेला हिंसाचार; पंतप्रधान मोदी यांना त्याबाबत अवाक्षरही काढायला वेळ मिळाला नाही. विश्वगुरू होण्याच्या नादात देशातील गंभीर मुद्दे ते लक्षात घेत नाहीत, की त्याकडं जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात, हा संशोधनाचा भाग आहे. विरोधकांच्या ऐक्याला के. चंद्रशेखर राव, जगनमोहन रेड्डी, मायावती, नवीन पटनायक हे बाधा आणीत आहेत. मायावती यांनी उत्तर प्रदेशात सवती चूल मांडली आहे. डावे “इंडिया” आघाडीत एकत्र आले असले, तरी त्यांचा सध्याचा पवित्रा पाहता ते इंडिया आघाडीत एकत्र नांदणार नाहीत, हे स्पष्ट आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनजी यांनी डाव्यांशी युती करणार नाही, हे जाहीर केलं आहे. काँग्रेसनं डावे किंवा तृणमूल यापैकी एक पर्याय निवडा, असं त्यांनी काँग्रेसला सांगितलं आहे. डाव्यांची घटती ताकद पाहता आणि डाव्यांचा केरळमधाल प्रतिस्पधी काँग्रेस आहे हे पाहता काँग्रेसलाही डाव्यांपेक्षा तृणमूल काँग्रेसशी करणं जास्त सोईचं असेल.

भाजपनं चंद्राबाबू नायडू यांचा तेलुगु देसम पक्ष यांच्या पक्षाशी युती करण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते;परंतु वायएसआर काँग्रेसनं केलेली मदत लक्षात घेऊन नायडू यांचा राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील प्रवेश रद्द झाला. अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला राष्ट्रीय लोकशाही आघाडीत आणलं आहे. धर्मनिरपेक्ष जनता दल राष्ट्रीय लोकशाही आघाडीत प्रवेश केला आहे. त्यामुळं कर्नाटकात भाजप आणि धर्मनिरपेक्ष जनता दल मिळून काँग्रेसपुढं तगडं आव्हान उभं करू शकतील. दुसरीकडं काँग्रेसनं धर्मनिरपेक्ष जनता दलाच्या आणि भाजपच्या काही नेत्यांना प्रवेश देऊन आव्हान स्वीकारल्याचं दाखवलं आहे. भाजप आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाची मताची टक्केवारी ३२ पर्यंत जाऊ शकते. आगामी लोकसभा निवडणूक राहुल गांधी विरुद्ध नरेंद्र मोदी अशी व्हावी, अशी भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांची इच्छा आहे; परंतु विरोधक तसं होऊ देणार नाहीत. मुस्लिम तुष्टीकरणासाठी राहुल हिंदू धर्माचा अपमान करत आहेत, असा आरोप भाजप करीत आहे. त्याच वेळी केंद्रीय मंत्रिमंडळात एकही मुस्लिम चेहरा नाही. सुमारे वीस कोटी मुस्लिमांना लोकसभेत उमेदवारी दिली नाही, तरी आपल्याला काही फरक पडत नाही, आपण निवडून येतो, अशी भाजपची मानसिकता झाली होती; परंतु नयना शर्मा प्रकरणामुळं आता भाजपला मुस्लिमांची दखल घ्यावी लागली आहे. पसंमदा मुस्लिमांना जवळ करण्याचा आदेश दस्तुरखुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच भाजपच्या कार्यकर्त्यांना दिला आहे. देशातील सर्वात मोठं राज्य उत्तर प्रदेशमध्ये मुस्लिम मतं मिळविण्यासाठी भाजपनं एक नवीन डाव खेळला आहे. भाजप अल्पसंख्याक आघाडी राज्यातील ६५ लोकसभा मतदारसंघात ३.२५ लाख मोदी मित्र बनवण्याच्या योजनेवर काम करत आहे. या सर्व लोकसभा जागांवर मुस्लिम मतदारांची संख्या ३० टक्क्यांहून अधिक आहे. हे लक्षात घेऊन प्रत्येक विधानसभेत पाच हजार मोदीमित्र बनवण्याचं लक्ष्य पक्षानं ठेवलं आहे. या पाश्वर्भूमीवर उत्तर प्रदेशच्या देवबंदमध्ये भाजपच्या अल्पसंख्याक आघाडीची महत्त्वपूर्ण बैठक झाली. दारुल उलूम हे देवबंदमधील इस्लामिक शिक्षणाचं प्रमुख केंद्र आहे. देवबंदमध्ये सुमारे १५० मुस्लिम विचारवंत आणि मोदी यांचा प्रभाव असलेल्या लोकांना “मोदी मित्र” नावाचं प्रमाणपत्र देण्यात आलं. देवबंद विधानसभा सहारनपूर लोकसभा मतदारसंघात येते. गेल्या निवडणुकीत सहारनपूर लोकसभा मतदारसंघत भाजपचा पराभव झाला होता. या लोकसभा मतदारसंघात मुस्लिम मतदारांची संख्या ३० टक्क्यांहून अधिक आहे. त्यासाठी प्रत्येक विधानसभेत पाच हजार मोदीमित्र बनवण्याचं लक्ष्य भाजपनं ठेवलं आहे. भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या वतीनं या कार्यक्रमासाठी देशभरातील ६५ लोकसभा मतदारसंघ निवडण्यात आले आहेत. दहा राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशात लोकसभेच्या या जागा आहेत. उत्तर प्रदेशातून प्रचार सुरू करण्यामागचं कारण म्हणजे राज्यात अल्पसंख्याक समुदायांची संख्या सर्वाधिक आहे आणि लोकसभेच्या जागांच्या बाबतीतही उत्तर प्रदेश आघाडीवर आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली पसमांदा मुस्लिम भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. भाजपची गरीब कल्याण योजना ही जनसामान्यांशी निगडीत आहे.

हिमाचल प्रदेश आणि कर्नाटकमधील विजयानं उत्साही झालेली काँग्रेस जोरदार पुनरागमन करताना दिसत आहे. त्याचबरोबर जे पक्ष काही काळ ग्रँड ओल्ड पाटीकडं लक्ष देत नव्हते, तेही काँग्रेसच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करत आहेत. दुसरीकडं, गेल्या दोन राज्यांतील पराभवातून धडा घेत भाजपनं नवी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. या अंतर्गत ते पुन्हा एकदा २०१४ आणि २०१९ ची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न करत आहेत. भाजपनं काँग्रेसशी थेट स्पर्धा असलेल्या १९९ जागांसाठी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. उत्तर भारतातील दोनशे जागांवर भाजप-काँग्रेसची थेट लढत आहे, त्या जागांना भाजपनं लक्ष्य केलं आहे. तिथं प्रादेशिक पक्ष नाहीत. त्यात मध्य प्रदेशातील २९, कर्नाटकातील २८, राजस्थानमधील २५, छत्तीसगडमधील २५, आसाममधील ११, हरियाणामधील १०, हिमाचलमधील ४, गुजरातमधील २६, उत्तराखंडमधील ५, गोवा-२, अरुणाचलमधील २, मणिपूरमधील २, अंदमानमध्ये निकोबारमधील १ जागा, चंदीगडमधील १, लडाखमधील १ जागा, लोकसभेच्या १६१ जागा आहेत. ३८ जागा अशा राज्यांत आहे, तिथं प्रादेशिक पक्ष मजबूत असले, तरी या जागांवर भाजप आणि काँग्रेसमध्ये थेट लढत आहे. यामध्ये पंजाबमधील १३ पैकी ४, उत्तर प्रदेशातील ८० पैकी ५, बिहारमधील ४० पैकी ४, तेलंगणातील १७ पैकी ६ आणि आंध्र प्रदेश,केरळमधील ५-५ यांचा समावेश आहे. २०१४ मध्ये भाजपनं या दोनशे जागांपैकी १६८ जागा जिंकल्या होत्या आणि काँग्रेसनं २५ जागा जिंकल्या होत्या, तर २०१९ मध्ये भाजपला १७८ आणि काँग्रेसला १६ जागा जिंकण्यात यश आलं होतं. या जागा मिळवण्यासाठी भाजप आणि काँग्रेस स्वतःला प्रबळ करण्याचा प्रयत्न करत आहेत, कारण येथील विजय त्यांना थेट दिल्लीत सत्तेवर घेऊन जाईल. अजूनही प्रादेशिक पक्ष काँग्रेसशी वाटाघाटी करण्याच्या प्रयत्नात असून, काँग्रेसला भाजपच्या विरोधात आघाडी करायची आहे; मात्र प्रादेशिक पक्ष काय भूमिका घेतात, त्यावर यश अवलंबून आहे. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीचं चित्र काय असेल हे सांगणं खूप घाईचं आहे; परंतु निवडणुकीच्या तयारीत गुंतलेले पक्ष आधीच त्यांच्या रणनीतीचा विचार करत आहेत. २०२४ मध्ये लोकसभा निवडणूक जिंकण्याची हॅटट्रिक करण्यासाठी “एनडीए”मधील जुन्या मित्रपक्षांना सोबत घेण्याच्या हालचाली भाजपनं सुरू केल्या आहेत. उत्तर प्रदेशात ओमप्रकाश राजभर यांच्या सुभासपा पक्षानं भाजपबरोबर युती केली आहे. बिहारमध्ये चिराग पासवान यांच्यासोबत भाजपनं युती केली आहे. संयुक्त जनता दलातून वेगळे झालेले उपेंद्र कुशवाहा आणि जीतनराम मांझी यांनी युती केली आहे.

शेतकरी आंदोलनाच्या मुद्यावरून भाजप-शिरोमणी अकाली दल युती तुटली. त्याचा फटका पंजाब विधानसभा निवडणुकीत दोन्ही राजकीय पक्षांना बसला. त्यामुळंच पुन्हा एकदा अकाली दलाला सोबत घेण्याची भाजपची तयारी सुरू झाली आहे. महाराष्ट्रात शिवसेना (शिंदे)-भाजप-राष्ट्रवादी (अजित पवार गट) विधानसभा निवडणुका एकत्र लढवणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीत भाजपचा दारूण पराभव झाला. त्यानंतर आता लोकसभा निवडणुकीसाठी कोणताही राजकीय धोका पत्करण्याची भाजपची इच्छा नाही. त्यामुळंच जुन्या मित्रपक्षांना सोबत घेऊन विरोधकांचा हल्ला परतवून लावण्याची प्रतियोजना भाजप धुरिणांनी आखल्याचं समजतं. आत्तापर्यंतच्या निवडणुका जर आपण पाहिल्या तर ज्याप्रमाणं उत्तर आणि पश्चिम भारतानं मोदी यांना डोक्यावर घेतलं. त्यामानानं दक्षिणेत मात्र भाजपला आत्तापर्यंत हवं तसं यश मिळालं नाही, हे मान्यच करावं लागेल. सर्व राजकीय पक्षांनी लोकसभा निवडणुकीसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला विजयासाठी कोणतीही कसर सोडायची नाही. मतदारांना आकर्षित करण्यासाठी पक्ष आता “सोशल मीडिया”चीही मदत घेणार आहे. याबाबत रणनीती आखण्यात आली आहे. “सोशल मीडिया”च्या माध्यमातून देशभरातील ३० टक्के लोकांपर्यंत आपलं काम, धोरणं आणि योजना पोहोचवण्याचं लक्ष्य भाजपनं ठेवलं आहे. भाजपच्या या योजनेंतर्गत उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांना लक्ष्य केलं जाणार आहे. भाजप अशा चेहऱ्यांना आपल्या “सोशल मीडिया टीम”मध्ये समाविष्ट करण्याचा प्रयत्न करेल, ज्यांचं ट्विटर, फेसबुक, इन्स्टाग्राम आणि यूट्यूबवर एक लाख ते २० हजार सबस्क्राइबर्स आहेत. भाजप “सोशल मीडिया”चा वापर करून लोकसभेच्या ३० टक्के जागांची निवडणूक समीकरणं प्रभावित करण्याचा प्रयत्न करत आहे. “सोशल मीडिया”चा वापर करून भाजपला देशभरातील लोकसभेच्या ५४३ पैकी १६३ जागांवर निकाल आपल्या बाजूनं बदलायचा आहे. “सोशल मीडिया टीम” तीन स्तरांवर तयार केली जाणार आहे. प्रथम, प्रत्येक लोकसभा स्तरावर एक निमंत्रक, एक सहसंयोजक आणि १० सदस्य असतील. दुसरं म्हणजे, प्रत्येक विधानसभा स्तरावर एक निमंत्रक, एक सहसंयोजक आणि पाच सदस्य असतील. प्रत्येक विभागीय स्तरावर तिसरी टीम तयार केली जाईल. त्यात एक समन्वयक, एक सह-समन्वयक आणि पाच सदस्य असतील. हे पथक राज्यस्तरावर अहवाल देतील. या माध्यमातून विरोधकांच्या टीकेचं खंडन करण्याचं काम पक्ष करेल. यासोबतच हा “सोशल मीडिया” राज्य आणि केंद्र सरकारचं यश लोकांपर्यंत पोहोचवण्यातही मदत करतो. यासोबतच काँग्रेस सरकारच्या काळात झालेला भ्रष्टाचार आणि अनियमितता यावरही प्रकाश टाकला जाणार आहे.

पुढील वर्षी जानेवारीत अयोध्येतील श्री रामजन्मभूमीवर उभारल्या जाणाऱ्या मंदिरात राम लल्लाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होत आहे. संपूर्ण देशाला राममय करण्याची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची योजना आहे. राम मंदिराचं स्वप्न साकार झाल्यामुळे निर्माण झालेल्या भावनांच्या लाटेची संपूर्ण देशात स्पंदनं निर्माण व्हावीत, असा संघाचा हेतू आहे. यातून सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि हिंदुत्वाची धार धारदार करून पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपच्या बाजूनं पोषक वातावरण निर्माण करण्याचा मानस आहे. पुण्यात आणि अवध (उत्तर प्रदेश)मध्ये संघांची गोपनीय बैठक झाली. भारतीय जनता पक्ष कमकुवत लोकसभा मतदारसंघात आपलं अस्तित्व मजबूत करण्यासाठी मोठी मोहीम सुरू करत आहे. त्यासाठी अशा सर्व क्षेत्रात येणाऱ्या विधानसभेच्या जागा आणि त्यांचे कार्यकर्ते सक्रिय केले जातील. एक हजार विधानसभा जागांवर प्रचार केला जाणार आहे. राज्यांतील सर्व बडे नेते, मंत्री आणि राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांना जबाबदारी दिली जाणार आहे. निवडणुकीपूर्वी या भागात कार्यकर्त्यांच्या अनेक बैठका आयोजित केल्या जाणार आहेत. राज्य युनिटला त्यांच्या कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यास सांगितलं आहे. कमकुवत जागांवर कार्यकर्त्यांना सक्रिय केलं जाईल तर ज्या राज्यांमध्ये भाजपचं सरकार आहे, तिथं राज्य सरकारचं यश सांगितलं जाईल. पक्षाचे स्टार प्रचारक, बडे नेते आणि संघटनेचे पदाधिकारी मिळून कमकुवत जागा बळकट करण्याची योजना पूर्ण करतील.

विरोधी पक्षांच्या एकजुटीनंतर आता त्यांच्यासमोर सर्वात मोठी समस्या आहे, ती जागावाटपाची. महायुतीतील प्रत्येक पक्ष अतिशयोक्त जागांची मागणी करत आहे. “आप” आणि तृणमूल काँग्रेससारखे पक्ष त्यांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये जागा वाटपात मक्तेदारी मिळवू इच्छित आहेत. काँग्रेसशासित कर्नाटक, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये विरोधी आघाडीतील घटक पक्ष काँग्रेसला समान स्वातंत्र्य देण्याच्या बाजूनं आहेत. “इंडिया” आघाडीचं नेतृत्व करण्याचा काँग्रेसचा मानस आहे. अशा स्थितीत जागावाटपावर सहज तोडगा निघण्याची शक्यता नाही. त्यामुळं या वर्षी होणाऱ्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांनंतरच जागावाटपाची चर्चा पुढे जावी, अशी काँग्रेसची इच्छा आहे. कर्नाटकात काँग्रेसच्या विजयानंतरच देशात विरोधी एकजुटीची चर्चा पुढं सरकली.

**भागा वरखडे**

विरोधी पक्षांचा काँग्रेसकडं पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. त्यामुळं जागावाटपाची चर्चा सुरू राहावी; पण या वर्षी होणाऱ्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांनंतरच अंतिम निर्णय घ्यावा, असं काँग्रेसला वाटतं. मिझोराम, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणामध्ये लोकसभा निवडणुकीपूर्वी विधानसभा निवडणुका होणार आहेत. काँग्रेसला जागा वाटपाची घाई झालेली दिसत नाही. हैदराबादमध्ये झालेल्या काँग्रेस कायर्कारिणीच्या बैठकीत जागावाटपाच्या सूत्रावर चर्चा झाली. त्यानंतर पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल येईपर्यंत पक्षानं वाट पाहायची, असं ठरलं. काँग्रेसला जागावाटपावर वर्चस्व हवं आहे. याआधीही लोकसभेच्या ३५० जागांवर निवडणूक लढवण्याचा काँग्रेसचा इरादा उघड झाला होता. तथापि, विरोधी आघाडीतील पक्ष त्यांना इतक्या जागा देण्याच्या मनस्थितीत नाहीत, विशेषतः आम आदमी पक्ष (आप) आणि तृणमूल काँग्रेस (टीएमसी). ममता बॅनजी यांनी अनेक प्रसंगी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत, की ज्या राज्यांमध्ये पक्ष मजबूत आहेत किंवा सत्तेत आहेत, त्यांच्या नेतृत्वाखाली लोकसभा निवडणुका लढल्या पाहिजेत. म्हणजेच काँग्रेस किंवा मित्र पक्षाला किती जागा मिळतील, हे त्या राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरवेल. विरोधी ऐक्यामध्ये सर्वात मोठी अडचण जागा वाटपाची आहे, कारण २८ पक्ष आघाडीत सामील आहेत. काँग्रेसनं सर्वांचं समाधान केल्यास त्यांच्या खात्यात १५०-२०० पेक्षा जास्त जागा येणार नाहीत, तर त्यांची एकत्रित संख्या लक्षात घेता काँग्रेसनं ३५० जागांवर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक राज्यात जागावाटपाचा प्रश्न अडकलेला दिसतो. बिहारमध्ये ४० जागा सहा पक्षांमध्ये विभागल्या जाणार आहेत. सीपीआय (एमएल) नं पाच जागांची मागणी केली असून त्यापैकी तीन जागा संयुक्त जनता दलाकडं आहेत. राष्ट्रीय जनता दल विधानसभेत सर्वात मोठा पक्ष आहे; पण लोकसभेत त्यांचा एकही खासदार आहे. संयुक्त जनता दलापेक्षा कमी जागा घ्यायला राष्ट्रीय जनता दल तयार नाही. काँग्रेसलाही बिहारमध्ये १० जागा हव्या आहेत. त्यामुळं बिहारमध्ये जागावाटप सोपं होणार नाही. महाराष्ट्रातही तसंच आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस फुटल्यामुळं काँग्रेस जास्त जागाचा दावा करणार हे स्पष्ट आहे. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेला किती जागा मिळणार, हा प्रश्न आहे. गेल्या वेळी एकत्रित शिवसेनेला १७ जागा मिळाल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसला चार तर काँग्रेसला एक जागा मिळाली होती. “इंडिया” आघाडीत ममता बॅनजी यांचा प्रस्ताव मान्य झाल्यास जागावाटपाची जबाबदारी राष्ट्रीय जनता दल आणि संयुक्त जनता दलाला उचलावी लागेल. उत्तर प्रदेशात भाजपच्या विरोधात काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्ष असे तीन प्रमुख विरोधी पक्ष आहेत. सध्या फक्त समाजवादी पक्ष आणि काँग्रेस विरोधी ऐक्यात एकत्र आहेत; पण काँग्रेस मायावतींसोबत युती करण्याच्या बाजूनं आहे. काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी मायावती यांच्याशी संपर्क कायम ठेवला आहे. मायावतीही आघाडीसोबत आल्या, तर समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांची प्रतिक्रिया काय असेल, हे पाहावं लागेल. हे तिघं एकत्र आले, तर जागावाटपावरून भांडण होईल.

काँग्रेससह २८ विरोधी पक्षांची युती असलेली “इंडिया”भारत मोदी सरकारला सत्तेतून हटवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे; परंतु काही संस्थांचे मतदानपूर्व सर्वेक्षण हाती आलं. त्यात “इंडिया” आघाडीत काँग्रेसला फारच कमी फायदा होताना दिसतो आहे. भाजपप्रणीत लोकशाही आघाडी आणि “इंडिया” आघडीतील मतांच्या टक्केवारीत फक्त अडीच टक्क्यांचा फरक राहील. यावरून असं म्हणता येईल, की गेल्या निवडणुकीनुसार २०२४ च्या निवडणुकीत “एनडीए” आणि “इंडिया” आघाडीची स्पर्धा होऊ शकते; परंतु एवढं सारं होऊनही काँग्रेसच्या जागांची संख्या तिहेरी आकडा पार करू शकत नाही. काँग्रेसच्या जागांमध्ये फार तर २०-२५ ची भर पडू शकते. विरोधकांच्या आघाडीला दोनशेच्या आतच जागा मिळतील, असा अंदाज विविध पाहण्यांनी व्यक्त केला आहे. भाजप जरी साडेतीनशे जागा मिळण्याचा दावा केला असला, तरी त्याच्या जागांची संख्या कमी होऊ शकते. तीनशेच्या आत जागा भाजपला मिळतील. महाराष्ट्र, बिहार, पश्चिम बंगाल या राज्यांत भाजपला मोठा फटका बसू शकतो. दक्षिण भारतात विस्ताराची संधी कमी आहे, तर उत्तर भारतात भाजपची सर्वोत्तम कामगिरी झाली आहे. तिथं विस्ताराला मर्यादा आहेत. निवडणुकीअगोदर घरगुती गॅसच्या किंमती कमी करण्यात आल्या आहेत. आता इंधनाच्या किंमती कमी होण्याची शक्यता आहे. मोफत रेशन योजनेला मुदतवाढ दिली जाण्याची शक्यता आहे.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# रस्त्यांच्या दळणवळणाच्या निर्मितीत डॉ. अनिलकुमार गायकवाड यांचे महत्त्वपूर्ण योगदान

## शिवसेना उपनेते शिवाजीराव आढळराव पाटील यांचे गौरवोद्गार

**रांजणी / रमेश जाधव**

राज्यातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या जडण - घडणीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अनिलकुमार गायकवाड यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे . दळण - वळणाच्या धमन्यांचा निर्माता म्हणून गायकवाड यांच्या कार्यकाळात रस्ते विकासाची झालेली अनेक आव्हानात्मक कामे , शासकीय अधिकाऱ्यांबरोबरच जनतेच्या कायमच लक्षात राहतील असे गौरवोद् गार शिवसेनेचे उपनेते माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी काढले .



आंबेगाव तालुक्यातील जाधववाडी ग्रामस्थांच्या वतीने नुकताच रस्ते विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी डॉ. अनिलकुमार गायकवाड यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा नागरी सन्मान करण्यात आला. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात शिवसेनेचे उपनेते शिवाजीराव आढळराव पाटील बोलत होते. यावेळी जुन्नरचे आमदार अतुल बेनके, पूर्वा दिलीप वळसे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयराव कोलते, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष गणपतराव फुलवडे, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे पाटील, शरद सहकारी बँकेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे माजी सभापती मंगलदास बांदल, ज्येष्ठ पत्रकार विशाल परदेशी, स्त्रीरोग तज्ञ डॉ. मोहन साळी, हृदयरोग तज्ञ डॉ. हर्षद शेटे, शिवाजीराव ढोबळे, ज्येष्ठ उद्योजक रतनभाई चोईथानी, उद्योजक सोपान बेल्हेकर, महाराष्ट्र राज्य नवनिर्माण सेनेचे राज्याचे उपाध्यक्ष गणपतराव महाले, आंबेगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष ॲड.विष्णू हिंगे पाटील , ज्येष्ठ पत्रकार डि. के.वळसे पाटील ,उद्योजक संतोष चाकणकर,अमित कुदळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता प्रशांत पाटील, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कडुसरकर, उपअभियंता जी.एस. कोकणे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी उपस्थिता जनसमुदायाला उद्देशून बोलताना शिवसेना उपनेते आढळराव पाटील म्हणाले, गेली ४३ वर्ष डॉ.अनिलकुमार गायकवाड यांनी शासकीय सेवा करत असताना राज्यातील अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प मागी लावले आहेत . त्यामध्ये प्रामुख्याने देशातील महत्त्वाचा असा मुंबई - नागपूर हा समृद्धी महामार्ग तयार करण्यात डॉ.गायकवाड यांचे मोलाचे योगदान राहिले आहे . तर नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन बांधकामातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे .त्यांच्या कार्यकालात सध्या रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून पुण्यातील रिंग रोड आणि मुंबई - पुणे महामार्गावरील मिसिंग लिंक रोड आदी महत्वाचे अवघड प्रकल्प प्रगतीपथावर असून सदर प्रकल्प डॉ. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वेळेत पूर्ण होतील असा विश्वास आढळराव पाटील यांनी यावेळी व्यक्त केला .

आढळराव पाटील पुढे म्हणाले गुणवत्ता प्रामाणिकपणा आणि वक्तशीरपणा हे डॉ. अनिलकुमार गायकवाड यांच्या यशस्वीतेचं त्रिसूत्री असून त्यांच्या कुशाग्र बुद्धीच्या जोरावर त्यांनी राज्यातील अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प लिलया पूर्णत्वास नेले.राज्य शासनाने डॉ. अनिलकुमार गायकवाड यांची महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय पदी केलेली नेमणूक ही सार्थ असून त्या पदाला ते प्रामाणिकपणे आणि खऱ्या अर्थाने न्याय देतील असा विश्वास आढळराव यांनी व्यक्त केला.

सत्काराला उत्तर देताना डॉ. अनिल कुमार गायकवाड म्हणाले जाधववाडी सारख्या ग्रामीण भागात माझा नागरिक सन्मान होणे ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे शासकीय काम करत असताना अनेक अडीअडचणींना सामोरे जावे लागले परंतु शासनाचे प्रामाणिकपणे काम करायचे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून अवघड आणि महत्त्वपूर्ण प्रकल्प माझ्या कार्यकाळात पूर्ण झाल्याचा मला अभिमान आहे ते पुढे म्हणाले ध्येयाने प्रेरित होऊन माणूस कुठेच यशस्वी होत नाही तो यशस्वी होतो. प्रतिकूल परिस्थिती मधून जी व्यक्ती यशापर्यंतचा प्रवास करते ती व्यक्ती सर्वांसाठी एक मार्गदर्शक असते. दृढनिश्चय आणि योग्य मूल्यांसह प्रतिकूल परिस्थितीतून आलेली व्यक्ती आव्हानांवर मात करू शकते असे ठाम मत डॉ. गायकवाड यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रम प्रसंगी आमदार अतुल बेनके 'पुर्वा दिलीप वळसे पाटील, पुणे जिल्हा बांधकाम समितीचे माजी सभापती मंगलदास बांदल, जेष्ठ पत्रकार विशाल परदेशी, डि.के. वळसे पाटील यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक चेतन जाधव यांनी केले तर आभार वरिष्ठ पत्रकार रमेश जाधव यांनी मानले.

# राजगुरुनगर सहकारी बँकेची अनोखी दिनदर्शिका सभासदांसाठी मार्गदर्शक ठरेल - अध्यक्ष दिनेश ओसवाल



**राजगुरूनगर प्रतिनिधी :** विज्ञान हे जगाच्या उत्क्रांतीचे, विकासाचे मुळ आहे. अनादी काळापासून चालत आलेल्या पारंपरिक साधन, सामग्रीत विज्ञानाने अमुलाग्र बदल घडवुन आणले. त्याची माहिती, इतिहास आजच्या युवकां पासुन ज्येष्ठ नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना सहज आकलन होण्यासाठी राजगुरुनगर सहकारी बँकेने ' एक क्रांतिकारी परिवर्तन ' ही संकल्पना राबवून सन २०२४ या वर्षाची दिनदर्शिका तयार केली आहे. ही दिनदर्शिका सभासद, नागरिकांना सर्वार्थाने मार्गदर्शक ठरेल असा विश्वास राजगुरुनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष दिनेश ओसवाल यांनी व्यक्त केला.

राजगुरुनगर सहकारी बँकेच्या या दिनदर्शिकेचे प्रकाशन शनिवारी (दि ३०) बँकेच्या बाजार पेठ या मुख्य कार्यालयात अध्यक्ष दिनेश ओसवाल, उपाध्यक्ष अविनाश कहाणे व संचालकांच्या उपस्थितीत झाले. यावेळी मार्गदर्शन करताना अध्यक्ष श्री ओसवाल बोलत होते. संचालक राजेंद्र सांडभोर, विजयाताई शिंदे, अश्विनीताई पाचारणे, राजेंद्र वाळुंज,अरूण थिगळे, दिपक वारुळे, महेश शेवकरी, माजी जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र राक्षे, जगन्नाथ राक्षे, अधिकारी ॲड गायत्री बेरी, अमृत टाकळकर व इतर अधिकारी, कमर्चारी आणि सभासद, नागरिक यावेळी उपस्थित होते.

दरम्यान, राजगुरुनगर सहकारी बँकेच्या दिनदर्शिकेंत मराठी - इंग्रजी महिना, तारीख, सण - वार, तिथि शिवाय दरवषी नवीन पण अनोखी संकल्पना राबवन्यात येते. या वषी 'एक क्रांतिकारी परिवर्तन' संकल्पनेवर आधारीत प्रत्येक म्हणजे बारा महिन्याच्या पानावर वरच्या दशनी भागात माहिती, शोध इतिहास सचित्र छापण्यात आला आहे. पुवीच्या उपयुक्त शोधांमधील आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात लागलेले नवीन शोध , त्याचे शास्त्रज्ञ, संशोधकां सह संकल्प चित्र असल्याने अभ्यास दृष्टीने ही माहिती सर्व वयोगटातील व्यक्तींना उपयुक्त ठरणारी अशी आहे. अग्निचा शोध मध्ये गारगोटी ते गॅस, लढाई - युद्धमध्ये दगडी शस्त्र ते क्षेपणास्त्र वापर, शेती बियांपासून झाड ते टिश्यू कल्चर, लाकडी ओंडका ते आजच्या वाहनांची चाके, लाकडाचे छाप ते डिजिटल प्रिंटिंग, लाईट बल्ब ते एलईडी बल्ब, छाया चित्र ते चलचित्र, दिशादर्शक कंपास ते जीपीएस नेव्हिगेशन, स्टीम इंजिन ते बुलेट ट्रेन, टेलिफोन ते मोबाईल, विमान ते अवकाश यान, कॉम्प्युटर ते सुपर कॉम्प्युटर व इंटरनेट आदी विषयाचा त्यात समावेश आहे. याशिवाय बँकेच्या १७ शाखा असुन या प्रत्येक शाखेचा वर्धापनदिन, बँकेचे संस्थापक यांच्यासह थोर पुरुष, महीला यांचा जयंती, पुण्यतिथी बाबत माहिती देण्यात आली आहे.

# भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक विजयस्तंभाच्या स्मारकासाठी १०० एकर जमीन शासनाने संपादित करावी

## केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले

**मुंबई :** भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक विजयस्तंभा जवळची शंभर एकर जमीन राज्य शासनाने संपादित करून येथे शौर्याची प्रेरणा देणारे भव्य दिव्य आंतरराष्ट्रीय स्मारक उभारावे. त्यासाठी राज्य सरकार ५०० कोटींच्या निधीची तरतूद करावी, अशी मागणी आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केली. या मागणीसाठी आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटुन लवकरच पत्र देणार असल्याचे ना.रामदास आठवले यावेळी म्हणाले. भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी ना.रामदास आठवले यांनी भेट देऊन विनम्र अभिवादन केले.



भीमा कोरेगाव लढाई चा इतिहास हा पूर्वाश्रमीच्या महार पूवर्जांच्या अतुलनीय शौर्याचा प्रेरणादायी इतिहास आहे. हा इतिहास डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी ददेशाला दाखवून आमच्यातील शौर्याचा क्रांतीचा निखारा जागृत केला आहे. तीच शौर्याची; क्रांतीची; संघर्षाची प्रेरणा घेऊन जीवनात मार्गक्रमण करण्याचा आमचा आजचा नवीन वर्षाचा संकल्प आहे असे ना. रामदास आठवले यावेळी म्हणाले.

आंबेडकरी जनतेच्या वतीने दरवर्षी १ जानेवारी हा दिवस शौर्यदिन म्हणून साजरा केला जातो. लाखो आंबेडकरी अनुयायी भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक विजय स्तंभाला भेट देऊन विनम्र अभिवादन करतात. त्यासाठी येथे जागा अपुरी पडत आहे.या परिसरातील १०० एकर जमीन राज्य शासनाने संपादित करून भीमा कोरेगाव च्या ऐतिहासिक विजय स्तंभाचे भव्य आंतरराष्ट्रीय स्मारक उभारले पाहिजे. त्यासाठी राज्य शासनाने रु.५०० कोटी च्या निधीची तरतूद केली पाहिजे. असे ना.रामदास आठवले यांनी स्पष्ट केले.

भीमा कोरेगाव येथील विजय स्तंभाला अभिवादन केल्या नंतर पत्रकारांनी विविध प्रश्न विचारल्या नंतर नवीन वर्षाच्या शुभेच्छा ही ना.रामदास आठवले यांनी दिल्या. २००४ हे नवीन वर्ष विकासाचे आणि निवडणुकीचे वर्ष आहे. या वर्षात दलित आदिवासी ज्येष्ठ नागरिक; तृतीयपंथी; दिव्यांग सर्व नागरिकांना आपण न्याय देण्याचा प्रयत्न करू. प्रधान मंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात हे विकासाचे वर्ष ठरणार आहे.मोदींच्या नेतृत्वात सर्वांना न्याय मिळत आहे. नव्या वर्षात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात एन डी ए ४०० पेक्षा जास्त जागा जिंकेल असा विश्वास ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

# वाई मतदारसंघातील विकासासाठी सहकार्य करणार - शरद पवार

**बावधन प्रतिनिधी वाई :** मतदार संघातील शेती पाण्याच्या तसेच इतर सामाजिक समस्या सोडविण्यासाठी सवर्तोपरी सहकार्य करण्याची ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांनी पाणी परिषदेचे शिष्टमंडळाला दिली.



धोम बलकवडी धरणातील हक्काचे १.२८ टी एम सी पाणी वाई तालुक्याच्या पूर्व भागातील 27 गावे आणि वाडी वस्त्यांवरील शेतीला ग्रॅव्हिटीने मिळावे,आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचवून त्यांच्या जीवनात समृध्दी यावी यासाठी वाई तालुक्यातील पाणी परिषदेचे शिष्टमंडळ शरद पवार साहेबांना भेटले.

वाई बरोबरच वाई मतदारसंघात भेडसावणारा पाणी प्रश्न आणि निर्माण होणारे समस्या, उपजीविकेच्या साधनांची कमतरता ,तसेच इतर समस्यांसोबत आज वाई तालुक्यातील पाणी परिषदेच्या शिष्टमंडळ आदरणीय पवार साहेबांना पुणे येथे भेटले आणि निवेदन दिले.पवार साहेबांनी वाईच्या पूर्व भागातील पाणीटंचाई लक्षात घेता कार्यकारी अभियंता श्री. शिंदे यांच्याशी तात्काळ दूरध्वनीवरून संपर्क करून संवाद साधला आणि लवकरच वाई तालुक्यातील पूर्व भागातील 27 गावांची पाणी शेतीच्या पाण्याची समस्येचे कायमस्वरूपी निवारण करण्यासाठी तात्काळ पाऊले उचलावीत असे सांगितले.वेळ प्रसंगी राज्यसरकारशी चर्चा करू असेही साहेब म्हणाले.

याप्रसंगी ॲड निलेश डेरे ,श्री प्रताप यादव, सौ.अल्पना यादव,श्री सुरेश पवार ,श्री.विशाल डेरे,श्री गणेश जाधव, श्री राहुल ननावरे, श्री दीपक पवार उपस्थित होते.

# वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे हवामानात बदल, महाराष्ट्रावर पावसाचे सावट

**नागपूर :** वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे हवामानात प्रचंड बदल होत असून आठवड्याच्या उत्तरार्धात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. किमान तापमान १२ अंश सेल्सिअसच्या वर पोहोचले आहे.



देशभरात सर्वच ठिकाणी हवामानात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. महाराष्ट्रातील विदर्भात किमान तापमानाचा पारा दहा अंश सेल्सिअसपेक्षाही कमी गेला होता. त्यामुळे आता तरी कडाक्याची थंडी अनुभवायला मिळणार असे वाटत असताना हवामानात पुन्हा एकदा बदल घडून आलेत. पहाटेच्या सुमारास धुक्याची चादर अनेक ठिकाणी असली तरी ढगाळ हवामानदेखील राज्यात दिसून येत आहे. त्यामुळे पहाटे व रात्री साधारण थंडी तर दिवसा मात्र उकाडा आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार येत्या दोन दिवसांत विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रात हलक्या पावसाची शक्यता आहे. पुण्यातदेखील पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तर मध्य महाराष्ट्रातील काही आणि विदर्भातील नागपूरसह काही अशा एकूण २२ जिल्ह्यांत ढगाळ वातावरण राहील असा अंदाज आहे.

# शिवरायांच्या जगातील सर्वात मोठ्या पुतळ्याचा भूमिपूजन समारंभ छत्रपती संभाजी राजांच्या हस्ते होणार

- गोद्रे गावात साकारतोय तब्बल ११२ कोटी रुपयांचा प्रकल्प
- १२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ जयंतीला होणार भूमिपूजन



**नारायणगाव :-** छत्रपती शिवाजी महाराजांचा जगातील सर्वात मोठा पुतळा, भगवा ध्वज, शिव सुवर्ण मंदिर जुन्नर तालुक्यात उभारण्यात येणार असून सुमारे ११२ कोटी रुपये खर्च करून उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पाचे भूमिपूजन येत्या १२ जानेवारी रोजी उत्साहात होणार आहे, अशी माहिती माजी आमदार शरद सोनवणे यांनी दिली. २५ एकर क्षेत्रावर हा प्रकल्प साकारण्यात येणार आहे.

राज्यातील एकमेव जुन्नर तालुका हा पर्यटन तालुका घोषित झाल्यानंतर तालुक्याच्या पर्यटनात माजी आमदार शरद सोनवणे यांनी आणखी भर घालत छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारणार अशी घोषणा काही दिवसांपूर्वी केली होती.

गोद्रे (तालुका जुन्नर) या गावात या प्रकल्पासाठी त्यांनी तब्बल २५ एकर जागा खरेदी देखील केली आहे. गोद्रे गावात छत्रपती शिवरायांचं जगातील सर्वात उंच स्मारक म्हणजेच १११ फूट उंची असलेला पूर्णाकृती पुतळा, सर्वात उंच भगवा ध्वज तसेच शिवाजी महाराजांचे सुवर्ण मंदिर उभारणार असल्याचे माजी आमदार शरद सोनवणे यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

या कार्यक्रमाचा भूमिपूजन समारंभ दिनांक १२ जानेवारी ला म्हणजेच माँ साहेब जिजाऊ जयंतीच्या दिवशी कोल्हापूर संस्थानचे छत्रपती संभाजी राजे यांच्या हस्ते संपन्न होणार असून या ऐतिहासिक कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन देखील माजी आमदार सोनवणे यांनी केले आहे.

# केंद्र आणि राज्य सरकारच्या शेतकरी हिताच्या योजना तळागाळात पोहोचवा - गणेश भेगडे

**कराड / रमेश जाधव**

केंद्र शासन आणि राज्यशासन शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध योजना राबवत आहे. या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा विकास साधण्याचा प्रयत्न आहे. या योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवा, असे आवाहन किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे यांनी केले.




कराड येथे आयोजित भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा पश्चिम महाराष्ट्र विभागीय कार्यकारणी बैठकीत भेगडे बोलत होते. यावेळी किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस रामकृष्ण वेताळ, प्रदेश सरचिटणीस रंगनाथ सोळंके, संभाजी गड्डे पाटील, किसान मोर्चा सांगली जिल्हा अध्यक्ष राजाराम गरुड, प्रदेश उपाध्यक्ष शशिकांत देशमुख, पृथ्वीराज पवार , प्रदेश सचिव मनोज कासवा, राहुल तळपे , राहुल कळपे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भेगडे म्हणाले, केंद्र शासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवत आहे. किसान सन्मान योजना, प्रधानमंत्री पिक विमा योजना, शेतकऱ्यांसाठी विविध प्रकारच्या सवलती,ज्ञतसेच अवजारे खरेदी, ठिबक सिंचन, नवीन विहिरी पाडणे, यासाठी केंद्र शासन आणि राज्य शासन अनेक उपक्रम राबवत आहे. हे सर्व उपक्रम तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोचवून त्याचा लाभ त्यांना मिळवून द्यावा आणि शेतकऱ्यांना संघटित करावे.

यावेळी प्रदेश सरचिटणीस रामकृष्ण वेताळ म्हणाले , सर्व शेतकऱ्यांना शासकीय योजना मिळवताना येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन त्या सोडवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत आणि जास्तीत जास्त शेतकरी भाजपा किसान मोर्चाशी संलग्न करून या मोर्चाची ताकद वाढवली पाहिजे.

या पश्चिम महाराष्ट्र विभागीय संघटनात्मक बैठकीसाठी किसान मोर्चा सातारा जिल्हाध्यक्ष तानाजी थोरात, कराड तालुका अध्यक्ष शंकर शेजवळ, किसान मोर्चा लोकसभा समन्वयक सूर्यकांत पडवळ, किसान मोर्चा तालुकाध्यक्ष प्रशांत भोसले, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष रुक्मिणी जाधव, दिपाली खोत यांची उपस्थिती होती.

यावेळी किसान मोर्चाच्या नवीन पदाधिकाऱ्यांना नियुक्ती देण्यात आल्या. सातारा जिल्ह्या बरोबरच पुणे, सोलापूर, सांगली,कोल्हापूर या जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी या बैठकीसाठी उपस्थित होते.

### स्टेन्सिलचे अनावरण

या बैठकीमध्ये भाजपा किसान मोर्चाच्या स्टेन्सिलचे अनावरण करण्यात आले. हीच स्टेन्सिल प्रत्येक विधानसभा मतदारसंघांमध्ये जाणारा असून भाजप किसान मोर्चा जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या मनामध्ये बिंबवण्यासाठी या स्टेन्सिलचा उपयोग होणार आहे. गणेश भेगडे यांनी या स्टेन्सिलचे अनावरण केले.


# बँक अधिकाऱ्यांना मिळणार धडे

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना आता नागरी सहकारी बँकांमध्ये कार्यप्रशिक्षणाची (इंटर्नशिप) संधी मिळणार आहे. तसेच बँक अधिकाऱ्यांसाठी विद्यापीठाने पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाची निमिती केली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा वाणिज्य विभाग आणि पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशन यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. विजय खरे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. जी. श्यामला यांच्यासह बँक असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सुभाष मोहिते, उपाध्यक्ष साहेबराव टकले, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनिल करंजकर आदी उपस्थित होते.

# कुंडलीत हा ग्रह कमजोर असल्यास तुम्हीही रात्री उशिरापर्यंत जागत असाल

ज्योतिषशास्त्रानुसार नऊ ग्रहांचे अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम मानवी जीवनात दिसून येतात. जेव्हा एखादा ग्रह मजबूत स्थितीत असतो तेव्हा त्याच्या अनुकूल प्रभावामुळे व्यक्तीचे जीवन यशस्वी होते. त्याचवेळी एक कमकुवत ग्रह व्यक्तीला अनेक नकारात्मक प्रभावांनी त्रास देतो. जेव्हा ग्रह कमजोर होतात तेव्हा त्यांची लक्षणे आणि त्यांचे उपाय देखील ज्योतिषशास्त्रात तपशीलवार सांगितले आहेत. जर एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीत चंद्र ग्रह कमजोर असेल तर त्याला अनेक प्रकारच्या मानसिक समस्यांना सामोरे जावे लागते. कमकुवत चंद्र ग्रहाची लक्षणे आणि उपाय जाणून घ्या.



## कमकुवत चंद्राची अनेक लक्षणे आहेत

- कुंडलीत चंद्र कमजोर असेल तर व्यक्तीची निर्णय घेण्याची क्षमता कमी होऊ शकते.
- चंद्राच्या कमकुवतपणामुळे रहिवासी मानसिकदृष्ट्या अस्वस्थ राहू शकतात.
- कुंडलीत चंद्र कमजोर असेल तर व्यक्तीला मानसिक अस्वस्थता किंवा मानसिक आजार होऊ शकतो.
- कमकुवत चंद्रामुळे छोट्या-छोट्या गोष्टींवरून त्रास होऊ शकतो.
- अशा लोकांना सर्दी आणि खोकल्याचा त्रास होतो.
- त्यांना रक्तदाबाशी संबंधित समस्याही असू शकतात.
- चंद्र मजबूत करण्याचे मार्ग
- ज्या लोकांच्या कुंडलीत चंद्र कमजोर स्थितीत आहे त्यांनी ज्योतिषशास्त्रातील तज्ज्ञाचा सल्ला घेऊन मोती रत्न धारण करावे.
- कुंडलीतील कमकुवत चंद्र बलवान होण्यासाठी वटवृक्षाच्या मुळांना नियमित पाणी अर्पण करावे.
- चांदी हा चंद्राचा धातू मानला जातो. त्यामुळे ज्या लोकांच्या कुंडलीत चंद्र कमजोर असेल त्यांनी चांदीचे ब्रेसलेट, अंगठी, गळ्यात चांदीची साखळी किंवा पायात चांदीचे पैंजण घालावी.
- जर तुमच्या कुंडलीत चंद्र कमजोर स्थितीत असेल तर चुकूनही रात्री उशिरापर्यंत जागे राहू नका.
- पांढऱ्या वस्तूंचे दान केल्याने कमकुवत चंद्र बलवान होतो.



# पोळपाट-लाटणे श्रीमंत बनवू शकते, विश्वास बसत नसेल तर नक्की वाचा

स्वयंपाकघरात दररोज वापरण्यात येणारी सर्वात महत्त्वाची वस्तू पोळपाट-लाटणे देखील तुम्हाला आनंदी आणि श्रीमंत बनवू शकते असे म्हटले तर कदाचित तुमचा विश्वास बसणार नाही... पण होय! वास्तुशास्त्रानुसार स्वयंपाकघरात पोळपाट-लाटणे याचा योग्य वापर केल्यास घरातील समृद्धी वाढते. दुसरीकडे काही महिला या वस्तूंबद्दल काही अशा चुका करतात, ज्यामुळे घरात अशांतता आणि पैशाची हानी वाढू लागते. पोळपाट-लाटणे याचा योग्य वापर आणि त्याबाबत कोणत्या चुका करू नये हे जाणून घेणे आवश्यक आहे-

- वास्तुशास्त्राप्रमाणे जेव्हा पोळी बनवताना पोळपाट आवाज करत असेल तर वास्तुदोष उत्पन्न होतं. असे मानले जाते की, पोळपाटाच्या आवाजामुळे घरातील धनाची हानी होते. त्यामुळे जर तुमच्याही पोळपाटातून आवाज येत असेल तर ते लगेच बदला आणि दुसरे नवीन वापरण्यास घ्या. असे जमत नसेल तर तुम्ही तुमच्या पोळपाटाखाली कापड किंवा कागदही ठेवू शकता. यामुळे वास्तुदोष नाहीसा होतो.
- वास्तूप्रमाणे रात्री झोपण्यापूर्वी पोळपाट-लाटणे स्वच्छ धुवून ठेवावे. तसं तर पोळ्या झाल्याबरोबरच हे धुतले गेले पाहिजे. असे न केल्यास घरातील लोकांच्या आरोग्यावर प्रभाव पडतो आणि अधिकाधिक धन आजारावर खर्च होतं. सोबतच याने वास्तुदोष उत्पन्न होतं.
- अनेक घरांमध्ये स्त्रिया असे पोळपाट वापरतात, ज्याचे पाय तुटलेले असतात किंवा फक्त दोन पाय असतात. परंतु असे पोळपाट वापरणे तुम्हाला महागात पडू शकते. जर तुमच्या घरात असे पोळपाट असेल तर ते लवकर बदला.
- वास्तुशास्त्राप्रमाणे पोळपाट कधीही उलटून ठेवू नये, नाहीतर घरात वास्तुदोष वाढतो. या व्यतिरिक्त पोळपाट कधीही भांड्यांमध्ये किंवा कणिक-तांदळाच्या डब्यावर ठेवू नये. याने धनहानी होते. अशाने घरात मतभेद देखील वाढतात. तर काही लोक पोळ्या बनवल्यानंतर याला धान्य किंवा कणकेच्या डब्यावर ठेवतात. परंतु जाणून घ्या की, असे केल्याने जीवनात दारिद्र्य येतं. म्हणून चुकून असे करणे टाळावे.
- तसेच अनेकांना हे माहीत नसेल की पोळपाट-लाटणे खरेदी करण्यासाठी देखील शुभ मुहूर्त बघितला जातो. होय, पोळपाट-लाटणे खरेदी करण्यासाठी बुधवार हा दिवस सर्वात शुभ असल्याचे मानले जाते, तर मंगळवार आणि शनिवार या दिवशी चुकूनही पोळपाट-लाटणे खरेदी करू नये.

## गुगलची जागा घेण्याच्या तयारीत ॲपल; लवकरच येऊ शकतं कंपनीचं सर्च इंजिन

Apple Search

गुगल सर्च इंजिनना टक्कर देण्यासाठी अॅप्पल आपलं स्वतःच सर्च इंजिन घेऊन येण्याची तयारी करत आहे. कंपनी आपल्या डिवाइसवर गुगल सर्च इंजिनची जागा आपल्या स्वतःच्या सर्च इंजिनला देऊ पाहत आहे.

**गुगल**ला टक्कर देण्यासाठी ॲपल आपलं सर्च इंजिन आणण्याचा विचार करत आहे. जगात अनेक सर्च इंजिन आहेत, ज्यात गुगलला पसंती देणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. अनेक डिवाइसवर गुगल सर्च डिफॉल्ट ब्राऊजरच्या स्वरूपात वापरला जातो. परंतु ॲपलला थर्ड पार्टी ॲप्स आणि टेक्नॉलॉजी आपल्या प्रोडक्टवर वापरायला आवडत नाही. त्यामुळे ॲप स्टोअर व्यतिरिक्त आता ॲपल आपलं सर्च इंजिन आणण्याची तयारी करत आहे. चला जाणून घेऊया माहिती.

**गुगलची जागा घेणार ॲपल सर्च इंजिन :** रिपोर्टनुसार, ॲपल आपलं स्वतःचं सर्च इंजिन डेव्हलप करत आहे, जे कंपनीच्या डिवाइसवर लोकप्रिय गुगलची जागा घेऊ शकेल. ब्लूमबर्गच्या मार्क गुरमनच्या रिपोर्टनुसार ॲपल अनेक वर्षांपासून सर्च टेक्लोनॉजीवर प्रयोग करत आहे.

रिपोर्टमधून समोर आलं आहे की, आयफोन बनवणारी कंपनीला अजूनही बराच पल्ला गाठायचा आहे, परंतु जर त्यांची इंटरनल सर्च टेक्नॉलॉजीवर आली तर ॲपल युजर्स गुगलच्या तुलनेत जास्त इंटीग्रेटेड आणि प्रायव्हेट सोल्युशन वापरू शकतील.

रिपोर्टमध्ये सांगण्यात आलं आहे की ॲपल आधीपासूनच आपल्या काही ॲप्समध्ये आपल्या सर्च टेक्नॉलॉजीचा छोट्या प्रमाणावर टेस्टिंग करत आहे. ॲपलचं सर्च स्पॉटलाइटमध्ये दिसत आहे, जे युजर्सना उनके डिवाइसवर गोष्टी शोधण्यास मदत करत आहे.

ब्लूमबर्गच्या रिपोर्टमध्ये असं देखील सांगण्यात आलं आहे की, काही आयओएस आणि मॅकओएस व्हर्जनमध्ये आधीपासूनच ॲपलनं वेब सर्च रिझल्ट जोडण्यास सुरुवात केली होती, जे युजर्सना थेट त्या साइटवर घेऊन जातात आणि त्यांच्या प्रश्नांची उत्तरं देतात. काही वेळा रिझल्ट एक तर मायक्रोसॉफ्ट कॉर्पच्या बिंग किंवा अल्फाबेट इंकच्या गुगलद्वारे पावर्ड होते. सीरि वेब रिझल्ट सादर करण्यासाठी देखील त्या टेक्नॉलॉजीचा वापर करतो.

जर ही बातमी खरी ठरली तर आयफोनस, आयपॅड्स आणि मॅकबुक्ससह अनेक ॲपल प्रोडक्टमध्ये गुगलच्या जागी ॲपलचं सर्च इंजिन असेल. अद्याप कंपनीनं याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केली नाही. येत्या काळात याबाबत माहिती समोर येऊ शकते.

## या उपायांनी अवघ्या मिनिटाभरात थांबेल भळाभळा वाहणारं रक्त

**स्वयंपाकघरामध्ये** घाईत काम करताना अनेकदा नकळत बोटही कापले जाते. बोट कापलं गेलं की भळाभळा रक्त वाहायला सुरुवात होते. अशावेळेस अनेकजण घाबरून जातात, मात्र वेळीच काही घरगुती उपाय केल्यास हे वाहणारं रक्त थांबवायला मदत होते.

**बर्फ** - वाहणारं रक्त थांबवायचं असेल तर तात्काळ बर्फ लावा. यामुळे क्लॉटिंग होण्यास मदत होते. सोबतच दाहशामक आणि थंडावा निर्माण करण्याची क्षमता बर्फामध्ये असल्याने आराम मिळतो.

**हळद** - हळदीमध्ये ॲन्टी बॅक्टेरियल गुणधर्म असल्याने तसेच इंफेक्शन रोखण्याची क्षमता असल्याने ते फायदेशीर ठरते. धडपडल्यानंतर वाहणारं रक्त थांबवण्यासाठी हळद मदत करते. यामुळे जखमेमध्ये इंफेक्शन पसरत नाही.

**तुरटी** - तुरटीमध्येही ॲन्टी बॅक्टेरियल गुणधर्म आहेत. जखमेवर किंवा शरीराच्या कोणत्याही भागावर जखम झाल्यास त्यावर तुरटी फिरवा. यामुळे वाहणारे रक्त थांबते. पुन्हा रक्ताचं क्लॉटिंग होण्याच्या क्रियेला चालना मिळते. सोबतच इंफेक्शनचा धोकाही कमी होतो.

## गुगलची कमाल! स्मार्टवॉचमध्ये २जीबी रॅम; इतकी आहे गुगल पिक्सल वॉच २ ची किंमत

गुगलनं बुधवारी गुगल पिक्सल ८ सीरिजसह गुगल पिक्सल वॉच २ स्मार्टवॉच लाँच केलं आहे. नवीन सेकंड-जनरेशन वॉच स्नॅपड्रॅगन डब्ल्यू ५+ जेन १ चिपसेटसह बाजरात आलं आहे आणि सोबत २जीबी रॅम देखील देण्यात आला आहे. त्यामुळे स्मार्टवॉचची परफॉर्मन्स चांगली मिळते. यात ३०६एमएएचची बॅटरी मिळते जी ऑलवेज ऑन डिस्प्ले ॲक्टिव्ह ठेवून देखील २४ तासांचा बॅटरी बॅकअप देऊ शकते. यात ओएलईडी डिस्प्ले देण्यात आला आहे.

**गुगल पिक्सल वॉच २ ची किंमत :** नवीन गुगल पिक्सल वॉच २ ची भारतात किंमत ३९,९९० रुपये ठेवण्यात आली आहे. लाँच ऑफर अंतगर्त जे लोक नवीन पिक्सल ८ सीरिजचे स्मार्टफोन खरेदी करतील, त्यांना स्मार्टवॉच १९,९९९ रुपयांमध्ये खरेदी करता येईल. पिक्सल वॉच २ पॉलिश्ड सिल्व्हर/बे, मॅट ब्लॅक/ओब्सीडियन आणि अन्य कलर ऑप्शनमध्ये सादर केला गेला आहे. स्मार्टवॉच आता भारतात प्री-ऑर्डरसाठी उपलब्ध झाला आहे.



पिक्सल वॉच २ को पॉलिश्ड सिल्व्हर/बे, मॅट ब्लॅक/ओब्सीडियन आणि अन्य कलर ऑप्शनमध्ये सादर करण्यात आलं आहे. हे स्मार्टवॉच आता भारतात प्री-ऑर्डरसाठी उपलब्ध आहे.

**गुगल पिक्सल वॉच २ चे स्पेसिफिकेशन्स :** गुगल पिक्सल वॉच २ स्मार्टवॉचमध्ये ३८४ x ३८४ पिक्सल रिजॉल्युशनसह सर्क्युलर १.२-इंचाचा ओएलईडी डिस्प्ले मिळतो. यात २जीबी रॅमसह स्नॅपड्रॅगन डब्ल्यू ५+ जेन १ चिप मिळते, जी ४नॅनोमीटर चिप आहे. स्मार्टवॉचमध्ये ३०६एमएएचची बॅटरी आहे, जी ऑलवेज ऑन डिस्प्ले सक्रिय असल्यावर देखील २४ तासांचा बॅकअप देऊ शकते. कंपनीनुसार, यात १२ तासांच्या वापरासाठी फक्त ३० मिनिटांची चार्जिंग आवश्यक आहे.

वॉच जुन्या जनरेशनप्रमाणे कॉम्पॅक्ट ४१ मिमी डिझाइनसह येते. यात काही सुधार देखील करण्यात आले आहेत, ज्यात जास्त टिकाऊ कव्हर ग्लास आणि १००% रिसायकल्ड ॲल्युमिनियमचा समावेश आहे.

वॉच ६ महिन्यांच्या फिटबिट प्रीमियमसह येतं, ज्यामुळे तुमचे परफॉर्मन्स तपासले जाईल आणि गोळा केलेल्या डेटाचे विश्लेषण करण्यासाठी एआयचा वापर केला जाईल. हेल्थ आणि फिटनेस फीचर्समध्ये हाय पेस ॲक्टिव्हिटीसाठी अधिक अचूक मल्टी-पाथ सेन्सरसह ऑप्टिकल हार्ट रेट आणि ब्लड-ऑक्सिजन सेन्सरचा समावेश करण्यात आला आहे. हे वॉच तणाव ट्रॅक करतं आणि त्वचेचं तापमान देखील मोजतं. तसेच स्लीप क्वॉलिटी मेजर करण्याचं फिचर देखील यात आहे.

5ATM/IP68 रेटिंगसह, गुगल पिक्सल वॉच २ धुळीपासून वाचू शकतो आणि पूलमध्ये स्वीमिंग करण्यासाठी उपयुक्त आहे. यात यूडब्ल्यूबी-सक्षम डिवाइसच्या अचूक ट्रॅकिंगसाठी यूडब्ल्यूबी टेक्नॉलॉजी देण्यात आली आहे.

## या घरगुती उपायांनी हटवा चामखिळीचा त्रास



**चामखिळीचा** त्रास हा त्वचारोगांपैकीच एकच आहे. फारसा त्रासदायक नसल्याने अनेकजण त्याकडे दुर्लक्ष करतात. मात्र सौंदर्याच्या दृष्टीने चामखिळीचं वाढणं त्रासदायक ठरू शकतं. म्हणूनच चामखीळ लहान स्वरूपात असतानाच त्याला काढून टाकण्यासाठी प्रयत्न करणं फायदेशीर ठरू शकतं.

चामखीळ मोठ्या प्रमाणात असल्यास वैद्यकीय उपचारांनी त्यापासून सुटका मिळवा, मात्र सुरुवातीच्या टप्प्यावर मात्र चामखीळ हटवण्यासाठी काही घरगुती उपाय फायदेशीर ठरतात.

**चामखिळीचा त्रास दूर करण्यासाठी नैसर्गिक उपाय :** बोरीचा काटा चामखिळीचा त्रास दूर करण्यासाठी फायदेशीर ठरतो. चामखीळ कमी करण्यासाठी बोरीचा काटा तुपामध्ये भिजत ठेवा. त्यानंतर निवडुंगाच्या चिकामध्ये बुडवून तो चामखिळीवर लावा. हा उपाय नियमित २-३ दिवस केल्याने चामखिळीचा त्रास कमी होण्यासाठी मदत होते.

त्वचेवर बेंड उठत असेल तर त्यावरही बोरीची पानं फायदेशीर ठरतात. याकरिता बोरीची काही पानं स्वतःच्या लाळेमध्ये कुस्करून त्वचेवर लावा. नियमित या उपायानेही बेंड कमी होण्यास मदत होते. परंतु हा उपाय सुरुवातीच्या टप्प्यामध्ये करणंच अधिक फायदेशीर आहे.

**महत्त्वाची टीप** - सदर उपाय हे 'आपली माती आपली माणसं' या यूट्यूब चॅनलवर सांगितले आहेत. हे केवळ घरगुती उपाय आहेत. त्याचा वापर करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला अवश्य घ्यावा. 'झी 24 तास' कोणत्याही उपायांचे थेट समर्थन करत नाही. व्यक्तिपरत्वे उपायांचे परिणाम वेगवेगळे असू शकतात.

## तेलकट त्वचेसाठी जादुई ठरतो पुदिन्याचा फेसपॅक

आहारात पुदिन्याचा वापर करणं फायदेशीर आहे. हे तुम्हाला ठाऊक असेल. नेहमीच्या वाटपापासून ते अगदी मिंट मोहितोसारख्या ड्रिंकमध्ये आपण हमखास पुदिन्याचा वापर करतो. पुदिना थंड प्रवृत्तीचा आणि रेचक असल्याने पचनकार्य सुरळीत करण्यासाठी त्याचा हमखास वापर केला जातो, पण हाच पुदिना त्वचेला खुलवण्यासाठीदेखील वापरला जातो हे तुम्हाला ठाऊक आहे का?

**आरोग्यदायी पुदिना**

पचनक्रिया सुधारण्यासोबतच तोंडातील दुर्गंधीचा त्रास कमी करण्यासाठीदेखील पुदिना फायदेशीर ठरतो. त्वचेचं सौंदर्य खुलवण्यासाठीदेखील पुदिन्याचा वापर केला जातो.

**त्वचेसाठी पुदिना कसा ठरतो फायदेशीर?**

पुदिन्याच्या पानांमध्ये मिन्थॉल आणि ॲन्टी बॅक्टेरियल गुणधर्म असतात. उन्हात फिरल्यामुळे त्वचेचे होणारे नुकसान टाळण्यासाठी पुदिना फायदेशीर ठरतो. चेहऱ्यावर ॲक्ने, ब्रेकआऊट्स, सनबर्न, त्वचा लालसर होणं, रॅशेस येणं अशा समस्यांवर ते परिणामकारक ठरतं. त्वचाविकारांना दूर ठेवण्यासाठीदेखील पुदिन्याची पानं फायदेशीर आहेत.

कसा कराल पुदिन्याच्या पानांचा समावेश?

त्वचेसाठी मुलतानी माती गुणकारी आहे हे तुम्हाला ठाऊकच आहे. प्रामुख्याने तेलकट त्वचा असणाऱ्यांमध्ये त्वचेशी निगडीत अनेक समस्या वाढतात. त्वचेतील तेल दूर करण्यासाठी, क्लिंजिंगसाठी मुलतानी मातीसोबतच पुदिनाही फायदेशीर ठरतो.

मुलतानी माती, ताजी पुदिन्याची पानं, मध आणि दही एकत्र करा. हे मिश्रण सुमारे २० मिनिटं त्वचेवर लावा. फेसपॅक सुकल्यानंतर साध्या पाण्याच्या मदतीने हा पॅक काढून टाका. या पॅकमुळे त्वचा मॉईश्चराईज होण्यास मदत होते.



गुलाबपाणीदेखील त्वचेची पीएच व्हॅल्यू सुधारण्यास मदत करतात. यामधील दाहशामक गुणधर्म त्वचेचे सौंदर्य खुलवते. पुदिन्याच्या पानांसोबत मध आणि गुलाबपाणी मिसळणंदेखील फायदेशीर आहे. यामुळे त्वचा नैसर्गिकरीत्या हायड्रेटेड राहण्यास मदत होते.

## ...म्हणून पावसाळ्यात हिरव्या भाज्या खाणं धोकादायक

**उन्हाच्या** कडाक्यानंतर पावसाळ्याने हवेत गारवा निर्माण होतो आणि मनाला शातंता मिळते. त्याचप्रमाणे पावसाळ्यात खाण्यापिण्याच्या सवयींकडे दुर्लक्ष केल्यास शरीरावर वाईट परीणामही होतो. अनेक प्रकारच्या हिरव्या भाज्या पाहून खाण्याची इच्छा होत असेल तर जरा थांबा! कारण पावसाळ्यात उघड्या डोळ्यांनी न दिसणारे खूप प्रकारचे किटाणू आणि किडे त्यावर असतात. तुम्ही जर डाएट किंवा वजन कमी करण्याच्या विचारात आहात तर पालक, ब्रॉकली, कोशिंबीर करत असाल तर त्याचे तोटेही जाणून घ्या. पावसाळ्यात जर तुम्हाला हिरव्या पालेभाज्या खायच्याच असतील तर त्यांना मीठ किंवा लोणी लावून नंतर पाण्याने धुवून खाणे आरोग्यासाठी केव्हाही चांगले. पावसाळ्यात हिरव्या पालेभाज्या का खाऊ नये याबद्दल आपण जाणून घेऊया..

**भाज्यांमध्ये किटकांचं घर :** पावसाळ्यात कोबी, फुलकोबी आणि पालक यासारखे पदार्थ खाऊ नयेत कारण कीटक यामध्ये आपले घर बनवतात. त्यांना आपण उघड्या डोळ्यांनी पाहूही शकत नाही. या भाज्या खाण्यामुळे पोटदुखी आणि इतर संबंधित समस्या वाढतात.


**इन्फेक्शनचा धोका :** पावसाळ्यात या भाज्या धुवूनही त्याची घाण बाहेर पडत नाही. हा भाजीपाला मुख्यत्वे दलदलीच्या जमिनीतून येत असल्याने इन्फेक्शन होण्याचा धोका अधिक असतो.

**सूर्यप्रकाश नाही :** मान्सूनमध्ये सूर्यप्रकाश भाज्यांपर्यंत न पोहोचल्याने किटाणूंची संख्या वाढते आणि तशा भाज्या खाल्ल्याने शरीरात संसर्गजन्य रोगांना आमंत्रण मिळते.

**बनावट रंगाचे इंजेक्शन :** भाज्या हिरव्या आणि चमकदार भासविण्यासाठी रंग भरलेल्या इंजेक्शन दिले जाते. बनावट रंगाचा परिणाम शरीरावर होत असतो.

**अस्वच्छ भाज्या**

रस्त्यावरील हिरव्या पालेभाज्यांनी बनलेले पदार्थ खाऊ नका. त्या चांगल्या प्रकारे धुतल्या गेल्या नसतात. त्यामुळे पोटात बॅक्टेरिया गेल्याने इन्फेक्शन होऊ शकते. यामुळे अपचन, जंत, ताप येऊ शकतो.



## भात खाण्याचे फायदे

**भात** हा तसा हलका आहार. पण, अनेकांना या आहाराबद्दल भलतेच गैरसमज असतात. काही लोक म्हणतात भात खाल्ल्यामुळे वजन वाढते. तर, काही म्हणतात भात खाल्ल्याने सतत सुस्ती येते. पण, प्रत्येक पदार्थांमध्ये काही ना काही प्रमाणात गुण-दोष हे राहतातच. म्हणूनच आज आपण जाणून घेणार आहोत भात खाण्याचे फायदे...

**ऊर्जावर्धक :** भातामध्ये कार्बोहायड्रेट मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे त्यातून शरीराला मोठ्या प्रमाणावर ऊर्जा मिळते. आठवड्यातून तीन वेळा भात खाल्ल्याने शरीराला मोठा फायदा होतो.

**पोटाच्या समस्येपासून सुटका :** भात हा पचायला अगदीच हलका असतो. त्यामुळे भाताच्या सेवनाने डायरिया, अपचन यांसारख्या समस्यांपासून सुटका मिळते.

**मायग्रेनवर प्रभावी :** मायग्रेनच्या त्रासापासून सुटका मिळविण्यासाठीही भाताचे सेवन फायदेशीर ठरते. रात्री झोपण्यापूर्वी भातात मध मिसळून त्याचे सेवन केल्यास आराम मिळतो. हा उपाय साधारण एक आठवडा करावा.

**पोटविकारांवर प्रभावी :** दरम्यान, पोटातील जंतावरही भात प्रभावी ठरतो असे सांगतात.

**रक्तदाब नियंत्रणात :** भातामध्ये सोडियमची मात्रा योग्य प्रमाणात असते. त्यामुळे ज्या लोकांना रक्तदाबाचा त्रास आहे, अशा लोकांनी भात खाल्ल्यास फायदा मिळू शकतो.